UNIVERSITY OF PUNE
(General Section)
12 JUL 2011
Inward No.: 432

# महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र. १९७ /विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ६ जुलै २०११.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

विषय:- नव महाराष्ट्र युवा अभियान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धेबाबत.

महोदय,

राज्यातील स्त्रीभृण हत्तेच्या विरोधात समाजात जन जागृती होण्यासाठी नव महाराष्ट्र युवा अभियान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांच्या मार्फत निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. स्त्री भृण हत्ये विरोधात समाजात जागृती होण्याच्या दृष्टीने आपल्या विद्यापीठातील तसेच संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपरोक्त निबंध व चित्रकला स्पर्धेत सहभागी होण्यास प्रोस्ताहीत करावे. तसेच सदर संस्था स्त्रीभृण हत्तेच्या विरोधात समाजात जन जागृती सारखा स्तुत्य कार्यक्रम करीत असल्याने सदर संस्थेस आपल्या स्तरावर आवश्यकते सहकार्य करावे अशी विनंती आहे. सोबत माहितीपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. सदर कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमानाने राबविण्यात येत आहे. या प्रकरणी राज्य शासन कोणतेही आर्थिक दायित्व स्विकारणार नाही.

आपला

(प्र. गि. कानडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

VIMP & urgent

Hon: PSec (H&TED) Please issue orders for accepting patronage today itself for this social programme being organised by Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai

6/7/2011

सुप्रिया सुळे, खासदार

(लोकसभा)

बुधवार, ६ जुलै २०११

प्रति,

**मा.ना.राजेश टोपे**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय : नवमहाराष्ट्र युवा अभियान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित राज्यस्तरीय निबंध व चित्रकला (घोषवाक्यासह) स्पर्धेबाबत...**

**संदर्भ : 'जागर हा जाणिवांचा; तुमच्या माझ्या लेकीचा'...**
**लेक वाचवा, लेक जगवा, आता तरी लोकहो, जागे व्हा!**

महोदय

सविनय नमस्कार,

सन २००४ पासून मी महाराष्ट्रातील सामाजिक क्षेत्रात सक्रिय काम करण्यास सुरुवात केलेली आहे. गेली ७ वर्षेयुवा/अपंग/महिला स्वयंसहाय्यता, बचत गट/पर्यावरण/शिक्षण या विषयांवर मी या क्षेत्रातील तज्ज्ञांना बरोबर घेऊन काम करीत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला या विविध उपक्रमाद्वारे निश्चित स्वरुपाचे काही फायदेसुद्धा झालेले आहे. अर्थातच, हे सर्व तुम्ही मला सातत्याने देत असलेल्या सहकार्यामुळेच शक्य झालेले आहे.

०३ जानेवारी २००८ या सावित्रीबाई फुले जयंतीच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये यशस्विनी सामाजिक अभियानाची मुहूर्तमेढ रोवली गेली. गेली चार वर्षेमी व माझ्या सहकारी मैत्रीणी सातत्याने महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता/बचत गटातील महिलांच्या सबलीकरणासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवित असतो. यामध्ये महिलांचा सहभागही मोठ्या प्रमाणावर असतो. गेली काही वर्षांपासून केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशामध्ये एक नवीनच समस्या उभी राहिल्याचे आपण पहात आहात. दिवसेंदिवस मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी कमी होत चाललेले आहे.

केंद्र/राज्य शासन आपापल्या स्तरावर मुली वाचविण्यासाठी विविध उपक्रमाद्वारे प्रयत्नशील आहेतच. आपणही सामाजिक जाणिवेतून अशाप्रकारचा उपक्रम राबवावा, असे मला वाटते.

सध्याच्या आधुनिक जगात, समान हक्काच्या युगात मुलांचा हव्यास इतका पराकोटीला जातो की मुलीचा जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला जातो. आज महाराष्ट्रामध्ये १ हजार मुलांमागे ८८३ मुली असे प्रमाण आहे. आणि हेच प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चाललेले आहे. 'मुलगाच हवा' या वेड्या हव्यासापोटी दरवर्षी भारतामध्ये सुमारे ५ लाख मुली जन्माला येण्यापूर्वीच जीवनाला मुकतात. आज मुलीसुद्धा कर्तुत्त्ववान आहेत. कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत किंवा मागेही नाहीत. त्यामुळेच जन्माला येऊ घातलेल्या मुलीचा जन्मापूर्वीच बळी दिला जाऊ नये, या जागरुकतेसाठी आपण हा उपक्रम राबवित आहोत. या उपक्रमात आपण आमच्याबरोबर सहभागी व्हावे.

गुरुवार, २५ ऑगस्ट २०११ ते रविवार, २८ ऑगस्ट २०११ या दरम्यान आम्ही क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असलेले नायगांव (सातारा) येथून पुणे येथील महात्मा फुले वाडा येथपर्यंत सुमारे ६० कि.मी. पदयात्रा काढून ठिकठिकाणी लोकांचे लक्ष्य या प्रश्नाकडे वेधणार आहोत.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून राज्यस्तरीय निबंध व चित्रकला (घोषवाक्यासह) स्पर्धेचे आयोजन करण्याचे दि.२८ जून २०११ रोजी चव्हाण सेंटर, मुंबई येथे झालेल्या बैठकीत ठरविण्यात आलेले आहे. सदर बैठकीस आपलीही उपस्थिती होती. या बैठकीत आपल्याशी झालेल्या चर्चेनुसार आम्ही आपणाकडे सदर स्पर्धा नवमहाराष्ट्र युवा अभियान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करीत आहोत. यामुळे स्पर्धेत सहभागी स्पर्धकांची संख्या वाढून समाजप्रबोधन मोठ्या प्रमाणावर होईल. याकरिता खास बाब म्हणून आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांना सदर स्पर्धेत सहभागी होण्याविषयीचे आदेश सत्वर पारीत करण्यात यावे. स्पर्धेविषयीचे सविस्तर माहितीपत्रक सोबत पाठवित आहोत.

**सहकार्य व मार्गदर्शन अपेक्षित...!**

आपली नम्र,

(सुप्रिया सुळे)

सोबत :

स्पर्धेचे माहितीपत्रक

दिल्ली : १२, मीनाबाग, नवी दिल्ली- ११० ०११

● दूरध्वनी - ०११-२३०१८८७०/२३७९५१२१ ● फॅक्स - ०११-२३०१८६०१ ● ई-मेल: supriyasule@yahoo.co.in

मुंबई : सिल्व्हर ओक इस्टेट, बंगला नं-२, १ला मजला, भुलाबाई देसाई रोड, मुंबई- ४०० ०२६

● दूरध्वनी - २२८५२३४१ (कार्यालय) ०२२-२३५१५६०५ (निवास) ● टेलीफॅक्स - ०२२-२२८१३०१८

पुणे : इ १५ निसर्ग, मार्केटयार्ड, पुणे- ४११ ०३७

● दूरध्वनी - ०२०-२४२६३२६६ ● टेलीफॅक्स - ०२०-२४२६४२५३